# बि.ए – सहावे (IV) सेम – आंतरराष्ट्रीय संबंध

## प्रकरण - सहावे – सामुहिक सुरक्षितता

सामुहिक सुरक्षितताचा अर्थ - ‘सामुहिक सुरक्षितता’ यातील सुरक्षा हा शब्द उद्दिष्ट सांगणारा आहे तर सामुहिक हा शब्दप्रयोग उद्दिष्ट कशाप्रकारे साध्य करावयाचे आहे. जागतिक शांतता आणि सुरक्षितता प्रदान करण्याच्या दृष्टीने एक नवीन योजना, नवीन सिद्धांत प्रतिपादित तो मार्ग सांगणारा  आला तो सिद्धांत म्हणजे ‘सामुहिक सुरक्षितता’ सिद्धांत होय. हा सिद्धांत सर्व राष्ट्रे समान आहेत तसेच सर्वांनी मिळून सामुहिक सुरक्षा करायची आहे. थोडक्यात सामुहिक प्रयत्नाद्वारे सुरक्षिततेची, संरक्षणाची व्यवस्था निर्माण करणे म्हणजे ‘सामुहिक सुरक्षितता’ होय.

सामुहिक सुरक्षिततेचे स्वरूप – सामुहिक सुरक्षितता म्हणजे राष्ट्रहिताचे संरक्षण करण्यासाठी विभिन्न राष्ट्रांनी सामूहिकरीत्या निश्चित केलेली एक व्यवस्था होय, सामुहिक सुरक्षिततेला सामुहिक सुरक्षा व्यवस्था असते. केवळ एकटे राज्य सुरक्षिततेचा प्रयत्न करीत नाही. सामूहिकरीत्या शक्तीचा उपयोग केला जातो. व त्याचा लाभ सारख्या प्रमाणात सर्वांनी मिळतो. सामुहिक सुरक्षितता हा युद्ध टाळण्याचा एक मार्ग आहे. कारण आक्रमक राष्ट्राला युद्धाची धमकी देऊन आक्रमण मागे घेण्यास बाध्य केले जाते. सामुहिक सुरक्षिततेला परराष्ट्र धोरणाचे एक प्रभावी साधन देखील मानले जाते.

सामुहिक सुरक्षिततेची वैशिष्टे – १.सुरक्षेचे साधन २. भंग होणारी प्रकिया ३. अभिन्न अंग ४.प्रतिबद्धता ५.उत्तरदायित्व ६. विश्व सरकारचे खंडन ७.दोहोमधील दुवा ८.प्रभावशाली ९. माध्यम मार्ग इत्यादी बाबीवरून सामुहिक सुरक्षिततेचा मुख्य उद्देश आंतरराष्ट्रीय शांती आणि व्यवस्थेची सुरक्षितता सामुहिक प्रयत्नाद्वारे प्राप्त करणे होय.

सामुहिक सुरक्षिततेचे आधारभूत घटक – १.आंतरराष्ट्रीय संघटनेची निर्मिती २.व्यापक शक्ती संच ३.राष्ट्रांची धोरण समानता ४.स्व:हितास गौण स्थान ५.लष्करी करारात सामील न होणे इत्यादी मुद्याद्वारे जागतिक शांतात प्रस्थापित करण्यासाठी सामुहिक सुरक्षिततेशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही.

सामुहिक सुरक्षितता – संयुक्त राष्ट्राच्या मर्यादा –

१.शक्ती न करणे २.हितसंबधावर कार्यवाही न करणे ३.सामर्थ्यशाली व्यवस्था नाही ४.संघटनेला टांगती तलवार या सामुहिक सुरक्षितता – सयुक्त राष्ट्राच्या मर्यादा आहेत.

सामुहिक सुरक्षा व्यवस्था यशस्वी होण्यासाठी अटी – सामुहिक सुरक्षा व्यवस्था यशस्वी होण्यासाठी त्या व्यवस्थेला पोषक अशी परिस्थिती आवश्यक आहे. १. कारवाईबाबत एकमत २.परस्पर विश्वास

३.अनुकूल सत्ता विभागणी ४.कोणत्याही सत्तेच्या आक्रमणाला प्रतिबंध करण्याएवढे सामर्थ्य आवश्यक आहे ५.समान संकल्पना ६.व्यापक सभासदत्व ७.मोठया प्रमाणात नि:शस्त्रीकरण याव्यतिरिक्त सामुहिक सुरक्षितता यशस्वी होण्यासाठी काल्पनिक आदर्शांपेक्षा वास्तविकता लक्षात घेऊन धोरण आखणे आवश्यक आहे.

## प्रकरण सातवे – जागतिक दहशतवाद

### जागतिक दहशतवादाचा अर्थ –

जगात आज दहशतवादाची विभिन्न रूपे आढळतात. म्हणून नेमका दहशतवादाचा निश्चित अर्थ लावणे कठीण झाले आहे. राजकीय उद्दिष्टासाठी संघटीतपणे हिंसात्मक मार्गाने समाजात भीती निर्माण केली जाते तेव्हा त्याला ‘दहशतवाद’ म्हणतात. साधारणता राष्ट्रीय एकीकरणाच्या वेळी, स्वातंत्र्य चळवळीत, क्रांती काळात शासन संस्था किंवा राज्य घटना उलथून टाकण्याचा काही जणाचा प्रयत्न असतो. अशावेळी समाजाला शस्त्रास्त्राचा धाक दाखवून दहशतवादी आपली सत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात. त्यात महत्वाच्या व्यक्तीवर हल्ला करणे व मालमत्ता नष्ट करणे ही कृत्ये दहशतवादी संघटना करतात हा लढा दीर्घकालीन स्वरूपाचा असतो.

दहशतवादाचे स्वरूप – डॉ. राम आहुजा यांनी दहशतवादाचे स्वरूप सांगितले आहे. ते पुढीलप्रमाणे
१.दहशतवाद हा मानवी समाज, राष्ट्र, राज्याच्या विरुद्ध तसेच मानवी मूल्यांच्या विरुद्ध असतो.
२.दहशतवाद हा अवैध व बेकायदेशीर असतो तसेच त्याचा उद्देश हुकुमशाही व राजकीय स्वरूपाचा असतो. ३.दहशतवादामध्ये हिंसेचा, विध्वंसक साधनसामुग्रीचा अधांधुंद केला वापर जातो. मानवी जीवनाला भयभीत व संकटमय स्थितीत नेतो. ४.दहशतवाद हा एक युद्धाचाच प्रकार असला तरी हे युद्ध छुपे आणि अनिश्चित स्वरूपाचे असते. ५.राजकीय दहशतवाद राजकीय, जातीय किंवा धार्मिक उद्देश पुढे ठेवून एखाद्या व्यक्ती किंवा व्यक्तीसमुहाविरूद्ध किंवा लोकसंख्येविरुद्ध अधिकारी वर्गाद्वारे प्रत्यक्ष कृतीत आणलेला दहशतवादी धोरणाचाही समावेश होतो.

दहशतवादाची वैशिष्टे – १.हा राज्य व समाजाच्या विरुद्ध असतो. २.याचा राजकीय उद्देश असतो, हा अवैध व बेकायदेशीर असतो. ३.हा केवळ शत्रूलाच नाही तर जनसामान्याच्या मनात भय हिंसा निर्माण करतो. ४.हा आपल्या कार्याद्वारे अथवा हल्ल्याद्वारे मोठया प्रमाणात आकस्मिक परिस्थिती निर्माण करतात. ५.याचे कारनामे कोणत्याही तर्काला संगत नसतात. कधीकधी ते योजनाबद्ध, साहस प्रवृत्ती,

संहार करून हल्ले चढवतात. ६.दहशतवाद जात. धर्म, वर्ग, स्त्री. पुरुष यापैकी काही नसते. ६. हा बुद्धीसंगत विचारांना संपविण्याचे काम करतो.

दहशतवादाचे प्रकार –

१.राष्ट्राद्वारे आयोजित दहशतवाद २. समुहाद्वारे आयोजित दहशतवाद ३.अपराधावर आधारित दहशतवाद ४.नार्को दहशतवाद ५.मुद्यांना प्रेरित दहशतवाद ६.आंतरराष्ट्रीय दहशतवाद

दहशतवादाची कारणे –

१.दारिद्रय २.शोषण आणि अन्याय ३.धार्मिक कट्टरता ४.बेकारी-बेरोजगारी ५.अवैध शस्त्रांचा वापर ६.अवैध धंदे ७.भ्रष्टाचार ८.जातिवाद ९. विदेशातून आर्थिक मदत १०.पक्षीय राजकारण ११.विवध देशातील परस्पर हेवेदावे इत्यादी कारणे सांगता येतात.

## प्रकरण आठवे – मानवाधिकार

मानवाधिकारांचा अर्थ –

मानवी हक्कासाठी मानवाचा संघर्ष शतकानुशतके चालू होता. पुढे लोकतंत्र पद्धतीचा उदय झाला आणि मानवाला मानवी हक्क प्राप्त होण्याची चिन्हे दिसू लागली. समाज जीवन जगताना सुखी, आनंदी, निरामय आणि भयमुक्त जीवनास मानवाला हक्क प्राप्त होणे आवश्यक आहे. व्यक्तीला आपल्या व्यक्तीमत्त्वाचा सर्वोकृष्ट विकास साधता येईल अशी परिस्थिती म्हणजे मानवी हक्क होय. किंवा मानवी हक्कांची संकल्पना मानवी प्रतिष्ठेशी बांधली असून, मानवाला प्रतिष्ठेचे जीवन जगण्यासाठी जे हक्क आवश्यक असतात त्यांना मानवी हक्क असे म्हणतात.

मानवाधिकाराचे स्वरूप – मानवाधिकारांचा विकास हळूहळू झालेला आहे. सर्वप्रथम इंग्लंडमध्ये १२१५ ला मॅग्नाकार्टा 'महान घोषणा पत्र' प्रकाशित झाले. त्यामध्ये 'जोपर्यंत एखाद्या व्यक्तीवर अपराध सिद्ध होत नाही तोपर्यंत त्या व्यक्तीला बंदी किंवा निर्वासित करू नये' असा उल्लेख केला. इंग्लंडमध्ये १६७९ मध्ये 'बंदी प्रत्यक्षीकरण अधिनियम' मंजूर केले गेले. त्यानंतर १६८९ मध्ये 'अधिकार पत्र' नावाचे पुन्हा एक बिल पारित केले. ई.स १७७६ ला संयुक्त राष्ट्र अमेरिकेने स्वातंत्र्याच्या घोषणेबरोबरच मानवाधिकाराच्या घोषणेचे वर्णन केले. ई.स १७८९ ला फ्रान्सच्या क्रांतीत बोरवन वंशाच्या शासक लुई १६ वे आणि त्यांची सम्राज्ञीचा खून करून मानवाधिकार क्रांती घडवून आणली. विभिन्न आंतरराष्ट्रीय परिषदा, बर्लिन, कॉंग्रेस, ब्रुसेल्स संमेलन. हेग संमेलन (१८९९ -१९०७ ) या कालावधी मध्ये सामुहिक रूपाने व राष्ट्रसंघाचे मानवाधिकारावर अधिक जोर दिला. सन १९९३ चा भारत सरकारचा मानव

अधिकार संरक्षण कायदयानुसार मानव अधिकार म्हणजे व्यक्तीचे स्वातंत्र्य, जीवन आणि समतेशी निगडीत असे मुलभूत अधिकार, की ज्यांच्या संरक्षणाची हमी राज्यघटनेने दिली आहे आणि आंतरराष्ट्रीय ठरावामध्ये ज्यांचा समावेश आहे.

मानव अधिकाराचे महत्व- १.मानवता हाच धर्म आहे. २.शोषणमुक्त समाजाची निर्मिती करिता मानव अधिकार आवश्यक आहेत. ३.धार्मिक सहिष्णुता निर्माण करण्यास मानव अधिकाराची मदत होते.४.मानवी हक्क डावलनाऱ्या राष्ट्रावर दबाव आणण्यासाठी मानव अधिकाराची मदत होत असते. इत्यादी बाबी वरून मानव अधिकाराचे महत्व विशद करता येते.

मानव अधिकारासंबधी जागतिक संमेलन – मानवीय अधिकारांच्या घोषणेपासून २० वर्षानंतर १९६८ ला संयुक्त राष्ट्राने ‘आंतरराष्ट्रीय मानव अधिकाराचे वर्ष’ म्हणून घोषित केले. व त्याच वर्षी तेहरान या शहरात एक आंतरराष्ट्रीय संमेलन आयोजित केले. या संमेलन एकूण १७० राष्ट्रांनी व ८ गैरसरकारी संघटनानी उत्स्फ्रुतपणे भाग घेतला होता. ५ जून १९९३ ला आस्ट्रोलियाची राजधानी व्हिएन्ना मध्ये एक घोषणा केली. त्यानुसार पुढचे १० वर्ष मानव अधिकाराचे दशक म्हणून साजरे करावे असे ठरले होते. यानुसार मानवाधिकार उच्चाधिकाराचे पद निर्माण केले गेले. आज पर्यंत मानवाधिकाराच्या जवळपास ८० परिषदा आयोजित केल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने १.ई.स १९४८ ला नरसंहार थाबाविण्यासाठी परिषद घेतली गेली २. १९५१ मध्ये शरणार्थ्यासंबंधी परिषद घेतली. ३. ई.स १६६६ मध्ये रंगभेद समाप्ती परिषद ४. ई.स १९७९ ला स्त्री-भेदभाव समाप्ती परिषद ५.ई.स १९८९ ला बालकासंबधी परिषद घेण्यात आली. ६.ई.स १९९० मध्ये विस्थापित कामगारांच्या संबंधी परिषद घेण्यात आली होती. ७.ई.स १९९१ ला स्वेच्छेने धर्मपालणासंबधी परिषद आयोजित केली गेली.

भारत आणि मानव अधिकार –

भारताच्या राज्यघटनेतील तिसऱ्या भागात नागरिकांच्या मुलभूत हक्कांचे स्पष्टीकर कलम १३ ते १५ मध्ये नमूद करण्यात आले आहे. भारत सरकारने मानवी हक्क संरक्षण अधिनियम आक्टोबंर १९९३ साली अंमलात आणलेला आहे. याअंतर्गत “राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची’ स्थापना झाली. यानुसार केंद्र अर्कर आणि राज्य सरकार, खाजगी संघटना यांना सूचना व रिपोर्ट दिली जाते, त्यानुसार आयोग यांच्या विरोधात कार्यवाही करण्यासाठी अग्रसेर राहतो. संबधित सूचनेवर वरील संस्थेद्वारे निर्धारित वेळेत उत्तर प्रस्तुत करणे बंधनकारक असते. या आयोगाद्वारे दिलेल्या उत्तरावर पूर्ण तपासणी झाली तर कलम १८ च्या अंतर्गत कार्यवाही करण्यास तयार होत असते. त्यासाठी एका विशेष ‘मानवाधिकार न्यायाल्याची स्थापना केली आहे.

## सरावासाठी प्रश्न

### वस्तुनिष्ठ प्रश्न (रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून वाक्य पुन्हा लिहा)

१. आंतरराष्ट्रीय राजकारनांचा सबंध राज्यातील............. धोरणावर परिणाम करतो. (अंतर्गत, बहये, अंतर्गत व बहये, यापैकी नाही.)

२. वास्तववादी सिद्धांता चा प्रभाव ......ते ......पर्यंत राहिला आहे.(१९२० ते १९५०, १९३०ते १९५०, १९२५ते १९५०, १९२५ते १९५०, १९३५ते १९५०)

३. देशांच्या .......माध्येमातून महत्त्वाची ठिकाणे ,युद्ध स्थळे,समुद्राची खोली आणि द्रव्ये उपलब्ध असलेल्या ठिकाणाचे ज्ञान प्राप्त होते. (हवामान , नकाशाच्या ,स्थ्लाकुतीच्या, आकारमानाच्या.)

४. राष्टीय हितसंबंध हा ......प्रमुख आधार आहे .( परराष्ट्र धोरणाचा , सामुहिक सुरक्षितेचा, सत्ता संतुलांचा , मानवाधिकाराचा .)

५. सत्ता संतुलनाची सुरुवात ........नंतर झाली (इ.स.१५००, इ.स.१६००, इ.स.१७००, इ.स.१८०० )

६. ...........मध्ये पहिले महायुद्ध झाले .(इ.स.१९१४, इ.स.१९१५, इ.स.१९१६, इ.स.१९१७ )

७. .........मध्ये संयुक्त राष्टाने दहशतवादाला नियंत्रण करण्याचे ठरविले. (इ.स. १९७२, इ.स. १९७०, इ.स.१९७५, इ.स. १९७८)

८. ..........रोजी मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनामा प्रसिद्ध केला होता .(१० डिसेंबर १९४८, १२ नोव्हे.१९४८, १४ ऑक्टोबर १९५६, १५ ऑगस्ट१९४७)

### दीर्घोत्तरी प्रश्न

१.आंतरराष्ट्रीय सिद्धांताचा अर्थ सांगून खेळ सिद्धांत स्पष्ट करा.

२.राष्ट्रीय शक्ती म्हणजे काय ? राष्ट्रीय शक्तीचे आधारभूत घटक सांगा.

३.परराष्ट्र धोरण म्हणजे काय ? परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे सांगा.

४.सत्ता संतुलनाचा अर्थ सांगून स्वरूप व वैशिष्टे सांगा.

५.सामुहिक सुरक्षितता म्हणजे काय ? सामुहिक सुरक्षिततेचे आधारभूत घटक सांगा.

६.जागतिक दहशतवाद म्हणजे काय ? ते सांगून दहशतवादाची कारणे सांगा.

७.मानवाधिकार म्हणजे काय ? ते सांगून त्यांचे महत्व विशद करा.

## लघुत्तरी प्रश्न

१.आंतरराष्ट्रीय संबंधाचा सिद्धांत – वास्तववादी सिद्धांत

२.राष्ट्रीय शक्ती चा अर्थ व स्वरूप

३.परराष्ट्रीय धोरणाची वैशिष्टे

४.सत्ता संतुलनाचे प्रकार

५.सामुहिक सुरक्षिततेची वैशिष्टे

६.जागतिक दहशतवादाची कारणे

७.मानवाधिकारांचे महत्व

---

## संदर्भ -

तुलनात्मक शासन आणि राजकारण व आंतरराष्ट्रीय संबंध – प्रा.डॉ.विमल राठोड, प्रा.डॉ.सुशांत चिमणकर, अंशुक पब्लिकेशन नागपूर, प्रथम आवृत्ती २०१८ –ISBN NO.987-81-931789-6-6